# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed


**Multidisciplinary International Research Journal**


## June -2020

**ISSUE No-CCXXXIII(233)**










**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economi
G.S.Tompe Arts Comm,Sci C
Chandur Bazar Dist. Amra



This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Humanity Beyond Borders: A Study on Khushwant Singh's Train to Pakistan | **Dr Veena Ilame** | 1 |
| 2 | A Comparative Study Of Weightlifters Performance in All India Inter University weightlifting competition 2018 and 2019 | **Dr. Shivaji Dnyandeo Bhintade** | 6 |
| 3 | Disputes Relating To Environment And The Role Of National Green Tribunal | **Dr. Varsha N. Deshmukh** | 11 |
| 4 | The portrayal of Aristocratic Women in Mrs Henry Wood's Fictions | **Anil Jaydeo Ganvir** | 15 |
| 5 | Wild Life (Protection) Amendment Act 2017 With Reference to Protection of Critically Endangered Species | **Adv. Archana W. Awaghad** | 29 |
| 6 | Women Entrepreneurship Problems &Prospects Developmentin the Rural Area" | **Prof. Dr. Dattatraya S. Tambe** | 32 |
| 7 | Ecolinguistics : The Relationship between Language and Environment | **Prof. Meshramkar Sunetra** | 39 |
| 8 | Personal Hygiene and Reproductive Health Awareness during Pubertal Development of Adolescent Girls. | **Dr. Sharmila Kubde** | 42 |
| 9 | "Role of Reserve Bank of India in Indian Economy" | **Asst. Prof. Sangita Virendra Dumore** | 46 |
| 10 | आत्महत्या ही एक सामाजिक समस्या | प्रा.डॉ.बी.एल. म्हस्के | 49 |
| 11 | ज्ञानेश्वरीतील कर्म विचार | डॉ. राजेश मिरगे | 53 |
| 12 | 'लॉकडाऊन आणि भारतीय कायदा' | डॉ. दिनेश चं. निकाळजे | 56 |
| 13 | कृतीशील विचारवंत लोकमान्य टिळकांच्या प्रेरणादायी विचारांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास | **डॉ. संभाजी संतोष पाटील** | 61 |
| 14 | 'जागतीकीकरणाचा भारतातील आदिवासी संस्कृतीवरील परिणाम' | प्रा.डॉ.बाळकृष्ण पुं.अढाऊ | 68 |
| 15 | भेदिक लावणी संगीताचे अध्ययन | प्रा. वैशाली एस.चौरपगार (मोहोड) | 71 |
| 16 | आदिवासीं मावची जमातीतील स्मृतीस्तंभ (खांबदेव) | **प्रा. वळवी कवित्रा सिपु** | 74 |
| 17 | आचार्य बुद्धघोष रचित 'सिद्धार्थचरितमहाकाव्यम्' में उत्प्रेक्षालंकार योजना का विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 78 |

| | | |
|---|---|---|
| 18 | कोरोना महामारीतील लॉकडाऊन काळात भारतीय संगीताची भूमिका **डॉ. सरिता इंगळे** | 84 |
| 19 | पर्यावरण: प्रदूषण व संवर्धन महत्व प्रा.डॉ.रमेश पुंडलीक देशमाने | 87 |
| 20 | व-हाड प्रांतातील होमरूल आंदोलनाचा इतिहास **डॉ.निलय देशमुख** | 93 |
| 21 | 'धर्म' एक व्यापक धर्मजाणिवेचा शोध प्रा. डॉ. जयश्री संजय सातोकर | 97 |
| 22 | कर्मयोगी संत गाडगेबाबांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान **डॉ.प्रशांत सुखदेवराव चऱ्हाटे** | 102 |
| 23 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी कवितेतील आशय **प्रा.डॉ. केशव किसनसा गाडबैल** | 105 |
| 24 | राजकीय पक्ष - एक विश्लेषण **डॉ. संभाजी संतोष पाटील** | 109 |
| 25 | हिंदी के प्रयोगवादी उपन्यास : एक अवलोकन **डॉ. रवींद्रकुमार शिरसाट** | 115 |
| 26 | मॅग्नेटिक महाराष्ट्र - औद्योगिकरणाची गरूडझेप प्रा. डॉ. वर्षा गंगणे | 117 |
| 27 | भारतीय रूपया :– इतिहास अवमूल्यन के कारण और उपाय–एक अध्ययन प्रा.डॉ. ए.बी. पटले | 120 |
| 28 | ग्रामीण शेती आणि विज नियोजन प्रा. गायत्री चवाळे | 125 |
| 29 | चर्मकार समाजाचा पारंपारीक व्यवसाय व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन प्रा. डॉ. सुभाष के. पवार | 129 |
| 30 | जागतिकीकरणाचा स्त्री जीवनावर झालेला परिणाम प्रा.भास्कर पाढेन | 134 |
| 31 | **प्राचीन महाराष्ट्र व बौद्ध धर्म** **डॉ. घनश्याम सुबराव महाडीक** | 136 |
| 32 | Manual scavenger's in india- Their welfare and rehabilitation **Dr. Umesh N. Udapure** | 140 |
| 33 | The personal data protection bill, 2019: an analysis **Adv.Renuka Talokar** | 149 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,233(A)
ISSN : 2278-9308
June 2020

# चर्मकार समाजाचा पारंपारीक व्यवसाय व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. सुभाष के. पवार
सहयोगी प्राध्यापक स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ. ता. जि. अमरावती.

प्रस्तावना :

चर्मकार हा समाज बारा बलुतेदारापैकी एक समाज आहे. गावगाडयातील इतर बलुतेदाराप्रमाणे याही समाजाला एक स्वतंत्र पारंपारीक धंदा आहे. विशेषतः शेतक-याच्या शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामडयाची अवजारे तसेच चप्पल, जोडे, बुट, बैलाच्या गळ्यातील पट्टे आणि मोट तयार करुन देण्याची कामे त्याकाळी चर्मकाराची असत. या मोबदल्यात शेतक-याकडून वर्षाकाठी खळ्यावर सुगीच्या हंगामात, त्यांना धान्य दिले जाई. त्याला ते बेगमी म्हणत असत. या शिवाय काही दुरुस्तीची किरकोळ कामे केली तर त्या मोबदल्यात उरलेले अन्न दिले जाई. प्रत्येक सणासुदिला धान्य मिळत असे या मिळकतीवरच ते स्वतःची उपजिविका करीत असत. चर्मकार हा समाज हिंदू जाती व्यवस्थेमध्ये अस्पृश्य म्हणून गणला गेलेला समाज आहे.

अनुसूचित जातीत समाविष्ट असलेला चर्मकार समाज, महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातल्या शेजारी असलेल्या गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक तसेच राजस्थान, बिहार, पंजाब, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, इत्यादी राज्यात विखूरलेला असून त्यांच्या एकूण १२०० उपजाती आहेत. संपूर्ण भारतामध्ये अनुसूचित जातीत सर्वाधिक ८० टक्के लोकसंख्या चर्मकार समाजाची आहे. महाराष्ट्र मध्ये अनुसूचित जाती मध्ये चर्मकार समाजाचा लोकसंख्येच्या बाबतीत तिसरा कमांक आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये प्रत्येक गावात चर्मकार समाजाचे अस्तित्व आहे. महाराष्ट्र मध्ये हा समाज चर्मकार म्हणून ओळखल्या जातो. गुजरात राज्यात तो मोची म्हणून तर उत्तर प्रदेशात या समाजाला चमार म्हणतात. कर्नाटक राज्यात त्यांना डोहर किंवा ढोर असे म्हणतात. आंध्रप्रदेशात मादिगा असे म्हणतात. तामिळनाडूत चकल्लीयान असे म्हणतात. पश्चिम बंगाल मध्ये यांना डोम किंवा दोसध असे म्हणतात. पंजाब मध्ये चामरंग, चर्मवार असे म्हणतात. मध्य प्रदेशात त्यांना राम नामे, अहिरवार, कोरी चमार म्हणतात.

विषयाची निवड :

अजुनही भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टीने आणि भारतीय सामाजिक मानव शास्त्राच्या दृष्टीने बरेच ज्ञान समाजासमोर यावयाचे आहे. भारतात अजुनही अशा अनेक जमाती आहेत की, ज्यांच्या विषयी विविध अंगाने अध्ययन झालेले नाही. अशा समाजाचा अभ्यास केल्यास भुतकालिन गोष्टींचा उलगडाही होतो. आणि वर्तमान सामाजिक परिणामांचा प्रभाव आणि वेग देखील सहज लक्षात येवू शकते त्यामुळे परिवर्तनाच्या सिद्धांताची तपासणी देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्ष होण्यास त्यातून मदत मिळत असते. अशाच जाती पैकी चर्मकार नावाची एक जात आहे. आतापर्यत इतर सुधारलेल्या समुदायापासून वंचित समुदाय असल्यामुळे तो देखील अनेक ठिकाणी आढळतो, असे असले तरी त्याचे एक औद्योगिक क्षेत्र एकवटलेले दिसून येते. अशा समाजाचा अभ्यास करावयाचा म्हणजेच तो समाज ज्या क्षेत्रात अधिक संख्येने एकवटलेला दिसून येतो त्या क्षेत्राची निवड करणे आवश्यक असते. विदर्भातील अमरावती जिल्ह्यात हा समाज साधारणपणे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक संख्येने वसलेला दिसतो. स्वातंत्रोत्तर काळात भारत सरकारने सर्वांना न्याय मिळावा, सर्वाचा विकास व्हावा, सर्वांना समान संधी मिळावी, शिक्षणाची दारे सर्वांना खुली असावी. असे धोरण स्विकारले. समाजाचा विकास व्हावा, राष्ट्रीय प्रवाहात त्यांना आणले पाहिजे, या उद्देशाने त्यांच्या विकासासाठी शासना मार्फत काही योजना आखण्यात आल्या. उदा. मोफत शिक्षण, नौक-यांमध्ये आरक्षण, आर्थिक सवलती,

त्यांच्यासाठी सहकारी संस्थांची निर्मिती वगैरे सोयी करण्यात आल्या. या सोयीचा लाभ या समाजाने कितपत घेतला? कितपत दिला गेला? ज्याचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम काय झाला? हे सर्व प्रश्न संशोधका समोर स्वाभाविक पणे आहेत, त्यातच स्वातंत्र्यानंतर उद्योगांचे विकेंद्रिकरण होण्या ऐवजी मोठ्या शहरात केंद्रिकरण झाले. औद्योगिकरणाचा वेग वाढला. शहरीकरण वाढत गेले. नविन कायदे अस्तित्वात आले. दळणवळणची साधने वाढली. पशु संवर्धन कायदे तयार करण्यात आले. या सर्वाचा एकूण परिणाम समाजजीवनावर होणे स्वाभाविक आहे. या सर्व घडामोडीचा चर्मकार समाजावर किती परिणाम झाला, या परिणामातून त्याचे कोणते प्रश्न सुटले व कोणते निर्माण झाले, हा ही एक महत्वाचा भाग आहे. याचे शास्त्रीय अध्ययन झाले पाहिजे या हेतूने " चर्मकार समाजाचे पारंपारीक व्यवसाय व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ चादुर बाजार तालुका) या लघुसंशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन पध्दती :

सदरील लघुशोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. अमरावती तालुक्यातील एकुण ६० चर्मकार उत्तरदात्यांची निवड करुन त्यांची मुलाखत घेण्यात आली. प्राथमिक सामग्रीत मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. तसेच द्वितीय सामग्रीत विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

लघुशोध निबंधाची उदिष्टये:

१. चर्मकार समाजातील आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. चर्मकार समाजातील पारंपारीक व्यवसाय याविषयी अध्ययन करणे
३. चर्मकार समाजातील पारंपारीक व्यवसायातून आर्थिक गरजांची पूर्ती होते काय? याविषयी जाणुन घेणे.
४. शासनाच्या विविध योजनांचा चर्मकार समाजातील लोकांना कितपत लाभ झाला हे तपासणे.

प्राप्त माहितीचे विश्लेषण:

मनुष्य जीवन जगत असतांना कोणता तरी व्यवसाय करुन उत्पन्न मिळवत असतो. ज्यावर तो स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो, कुटुबांचे राहणीमान त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. कुटुंबाच्या उत्पन्नास त्या व्यक्तिचा सामाजिक दर्जा निश्चित होत असतो. चर्मकार समाजात शेती व्यवसाय, शेतीवर आधारीत इतर पारंपारीक व्यवसाय व नौकरी असेल तर कौटुंबिक गरजा भागवून व्यक्ति बचत सुध्दा करीत असतो. उत्पन्नाच्या आधारावरच व्यक्तिचा आर्थिक दर्जा निश्चित होतो.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने एकुण ६० उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. सदर विषयाच्या अनुषंगाने त्यांच्याकडुन मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती प्राप्त करण्यात आली आहे. चर्मकार समाजातील उत्तरदात्याची आर्थिक दर्जा संबंधित माहिती सादर करण्यात आली आहे.

सारणी क्र. १

आर्थिक दर्जा दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | उच्च दर्जा | १५ | २५.०० |
| ०२ | अतिशय उच्च दर्जा | ०८ | १३.३३ |
| ०३ | निम्न दर्जा | २८ | ४६.६७ |
| ०४ | अतिशय कमी दर्जा | ०९ | १५.०० |
| ०५ | एकूण | ६० | १००.०० |

सारणी क्र. १ मध्ये, उत्तरदात्यांचे आर्थिक दर्जा याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. सारणी वरुन असे स्पष्ट होते की, एकुण उत्तरदात्यांपैकी १५ उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा हा उच्च स्वरुपाचा आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण २५ टक्के इतके आहे. तसेच ०८ उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा हा अतिशय उच्च स्वरुपाचा आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण १३.३३ टक्के इतके आहे. २८ उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा निम्न स्वरुपाचा आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ४६.६७ टक्के इतके आहे. आणि ०९ उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा हा अतिशय निम्न स्वरुपाचा आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण १५ टक्के इतके आहे.

सारणी क्र. २

व्यवसाय बाबतची माहिती दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | परंपरागत व्यवसाय | ३३ | ५५.०० |
| ०२ | शेती व्यवसाय | २३ | ३८.३३ |
| ०३ | नोकरी | ०४ | ६.६७ |
| ०४ | एकूण | ६० | १००.०० |

सारणी क्र. २ मध्ये चर्मकार समाजातील उत्तरदात्यांच्या व्यवसायाबाबत माहिती जाणुन घेतली असता असे दिसुन आले की, एकुण उत्तरदात्यांपैकी पारंपारीक व्यवसाय करणा-यांची संख्या ३३ आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ५५ टक्के इतके आहे. २३ उत्तरदात्यांचा व्यवसाय हा शेती व्यवसाय आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ३८.३३ टक्के इतके आहे. तर ०४ उत्तरदाते हे नोकरी हा व्यवसाय करतात. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ६.६७ टक्के इतके आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, त्यांचे व्यवसाय हा पारंपारीक आहे. तोच व्यवसाय आजही ते करीत आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ५५ टक्के इतके आहे.

सारणी क्र. ३

वय व लिंगभेदावर श्रमविभाजन दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | होय | ४८ | ८०.०० |
| ०२ | नाही | १२ | २०.०० |
| ०३ | एकूण | ६० | १००.०० |

सारणी क्र. ३ मध्ये, असे दिसुन येते की, एकुण उत्तरदात्यांपैकी ४८ उत्तरदात्यांनी चर्मकार समाजात वय आणि लिंगभेदावर आधारीत श्रमविभाजन होत असते असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ८० टक्के इतके आहे. तर

१२ उत्तरदात्यांनी नाही असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे.यावरुन असे स्पष्ट होते की, चर्मकार समाजात वय आणि लिंगभेदावर कामाची विभागणी होत असते.

सारणी क्र. ४

कोणता व्यवसाय करणे आवडेल? दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | भरपूर उत्पन्न देणारा | २१ | ३५.०० |
| ०२ | पारंपारीक व्यवसाय | ११ | १८.३३ |
| ०३ | विकासाच्या जास्त संधी असणारा | २८ | ४६.६७ |
| ०४ | एकुण | ६० | १००.०० |

सारणी क्र. ४ मध्ये चर्मकार समाजातील लोकांना कोणता व्यवसाय करणे आवडेल? यासंबंधी माहिती जाणून घेतली असता असे दिसुन आले की, एकूण उत्तरदात्यापैकी २१ उत्तरदात्यांनी भरपुर उत्पन्न देणारा व्यवसाय करणे आवडेल असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे. तर ११ उत्तरदात्यांनी पारंपारीक व्यवसायाला पसंती दिली आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण १८.३३ टक्के इतके आहे. २८ उत्तरदात्यांनी विकासाच्या जास्त संधी असणारा व्यवसाय करायला आवडेल असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ४६.३७ टक्के इतके आहे.यावरुन असे स्पष्ट होते की, चर्मकार समाजातील लोकांना विकासाच्या जास्त संधी देणारा व्यवसाय करायला आवडते.

सारणी क्र. ५

परंपरागत व आधुनिक व्यवसायाबात मत दर्शविणारी सारणी

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ०१ | परंपरागत व्यवसाय हे जातीचे कर्तव्य आहे | ०९ | १५.०० |
| ०२ | आधुनिक व्यवसाय अधिक प्रतिष्ठेचे आहे | २३ | ३८.३३ |
| ०३ | आधुनिक व्यवसावमुळे समाजाचा विकास होवू शकतो. | २८ | ४६.६७ |
| ०४ | एकुण | ६० | १००.०० |

सारणी क्र. ५ वरुन असे स्पष्ट होते की. चर्मकार समाजातील लोकांना परंपरागत व आधुनिक व्यवसायाबाबत त्यांचे मत जाणुन घेतले असता असे दिसुन येते की, एकुण उत्तरदात्यापैकी ९ उत्तरदात्यांनी परंपरागत व्यवसाय हे जातीचे कर्तव्य आहे. त्यामूळे ते व्यवसाय केले पाहिजे असे वाटते. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण १५ टक्के इतके आहे. तर २३ उत्तरदात्यांनी आधुनिक व्यवसाय अधिक प्रतिष्ठेचे आहे असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ३८.३३ टक्के इतके आहे. आणि २८ उत्तरदात्यांनी आधुनिक व्यवसायामुळे समाजाचा विकास होवू शकतो असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ४६.६७ टक्के इतके आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, चर्मकार समाजातील लोकांना आधुनिक व्यवसाय केल्यामूळे समाजाचा विकास होवू शकतो म्हणून आधुनिक व्यवसाय केला गेला पाहिजे.

ISSN : 2278-9308
June 2020

संदर्भग्रंथ सूची :

१. अत्रे त्र्यंबक नारायण,''गावगाडा''मोटे प्रकाशन, दादर मुंबई.तृतीय आवृत्ती १९५९

२. आगलावे प्रदिप,सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे,साईनाथ प्रकाशन,नागपूर. २००७.

३. चव्हाण रामनाथ नामदेव ,जाती आणि जमाती,मेहता पब्लिशिंग हाउस, सदाशिव पेठ,पुणे. - ३०, पहिली आवृत्ती - मार्च १९८९

४. बांदिवाडेकर / सहस्त्रबुद्धे ( संपा ) - विश्व चर्मकाराचे, ग्रथाली प्रकाशन, इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्या शाळा, सावरेकर मार्ग, गोखले रोड, उत्तर दादर, मुंबई

5. Acoff L. Russell,The Desigin of Social Research,The University of Chicago Press,Chicago (1961)

Website :

A. www.Google.com ,